# कोरोनाचा व्यापारी वर्चस्ववाद

**सद्यःस्थितीला औषधी साहित्याचा पुरवठा म्हणजेच संरक्षण हाच व्यापाराचा मुद्दा राहील. ज्या देशांना चीन कोरोनाविरुद्ध सहकार्य करेल, ते देश भविष्यात चीनचे नेतृत्व मान्य करतील का? या प्रश्नाचे उत्तर हे जागतिक राजकारणाची भविष्यातील दिशा ठरवेल.**

**- गजानन ज. साळुंखे**

- लेखक शिवाजी विद्यापीठात सहायक प्राध्यापक आहेत.

'कोरोना'च्या प्रादुर्भावाचा जनमानसावर आजपर्यंतच्या जागतिक इतिहासातील सर्वांत अधिक परिणाम झाला आहे. सामान्यांच्या मनात हा विषाणू म्हणजे जगातील दोन महाबलाढ्य सत्तांची वर्चस्वाची लढाई असल्याचे अंदाज बांधले आहेत.

चीनने काही वर्षांत व्यापार युद्धाच्या माध्यमातून अमेरिकेला दिलेल्या आव्हानामुळे अनेक तज्ज्ञांना कोरोना विषाणू ही चीनची आर्थिक वर्चस्वासाठीची नीती आहे, हेदेखील मान्य होत आहे. या विषाणूच्या प्रादुर्भावाला लढा देण्यासाठी चीन अनेक देशांना मास्क आणि औषधी साहित्याचा पुरवठा करीत आहे. त्यातून चीनला आपण जगातील एका जबाबदार नेतृत्वाची भूमिका बजावत आहे, असं भासवायचं आहे; पण जागतिक स्तरावर हा चिनी व्यापार आहे, असे मत उमटत आहे. चीनच्या या भूमिकेला आधार आला तो म्हणजे सर्बिया राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष आलेक्झान्द्र वुसिक यांचा विधानामुळे, सर्बियाच्या राष्ट्राध्यक्षांनी युरोपियन संघाकडे मास्क व इतर औषधी साहित्याची मागणी केली; पण युरोपियन संघातील राष्ट्रांकडून ही मागणी पूर्ण झाली नाही. सर्बियाची ही मागणी चीनने पूर्ण केली. त्यापाठोपाठ चीनने वुहान प्रांत खुला करत असल्याचे जाहीर केले. चीनने सर्बियाबाबत घेतलेल्या भूमिकेमुळे चीनने केवळ स्वतःच्या नव्हे, तर जगाच्या गरजेपुरते उत्पादन केले असल्याची क्षमता असल्याचे दाखवून दिले.

चीनला कोरोना विषाणूचा प्रादुर्भावाचा आर्थिक फटका बसला नाही, असे चित्र चीन निर्माण करू पाहत आहे. चीनमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यापासून तो नियंत्रणात येईपर्यंत २ कोटी १० लाख मोबाईल सीमकार्ड निष्क्रिय झाल्याचा अहवाल चीनमधील वायरलेस नेटवर्क सेवा देणाऱ्या संस्थेने दिला आहे. चिनी माध्यमांनी केवळ ३२८७ लोकांचा कोरोनाचा देशांतर्गत फैलावामुळे मृत्यू झाल्याचा दावा केला आहे, ही गोष्ट वरील गोष्टीला जोडून पाहिल्यास चीनचा या दाव्यावर शंका उपस्थित होते.

दुसरीकडे चिनने जागतिक आरोग्य संघटनेचा सदस्यांना चौकशीसाठी बोलावल्याने चीनने पुरावे नष्ट केले का? अशीदेखील शंका उपस्थित होत आहे. याउलट चीन अमेरिकेला आव्हान देत आहे, की अमेरिकेने जागतिक आरोग्य संघटनेचा सदस्यांना अमेरिकेत येऊ द्यावे. चीनच्या आरोपामुळे संशयाची सुई अमेरिकेकडे वळते. व्यापार युद्धात चीन जास्त काळ अमेरिकेला आव्हान देईल, असे अमेरिकेलासुद्धा वाटले नव्हते म्हणून आपले व्यापारी वर्चस्व टिकवण्यासाठी अमेरिकेने हा कट केला असण्याची शक्यता फेटाळता येत नाही.

आर्थिक वर्चस्व मिळवण्यासाठी चीन स्वतःची व्यापारी केंद्रे पुन्हा सुरू करत आहे आणि पाश्चात्त्य देशांतील कंपन्यांचे शेअर्स विकत घेत आहे, असेदेखील काही दावे समोर येत आहेत. या दाव्याची सत्यता पडताळत असताना हेदेखील लक्षात घेणे गरजेच आहे, की या विषाणूमुळे चीनचा स्वतःचा तिमाहीमधील आर्थिक वाढीचा दर ९ टक्के पेक्षा खाली येईल, असे अनेक आर्थिक संस्थांनी भाकीत केले आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वांत मोठ्या चिनी अर्थव्यवस्थेत जीडीपीची वाढ २०१९ मध्ये ६.१ टक्के वरून केवळ १ टक्के किंवा २ टक्केपर्यंत घसरू शकेल, असे चिनी सरकारच्या अर्थशास्त्र विश्लेषकांच्या ताज्या अंदाजानुसार वर्तविले आहे. सध्या स्थितीला जो दावा केला जात आहे, ही चीन या नामांकित कंपन्यांमधील शेअर्स विकत घेऊन या कंपन्या स्वतःच्या मालकीचा करू पाहत आहे, अशा नीतीने चीनला यश येईल, असे वाटत नाही, कारण जगावर आर्थिक मंदीचे संकट आले तर या नीतीपासून चीनला लाभ होईल, असे वाटत नाही..

# शिवाजी विद्यापीठ 'लॉकडाउन'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये ५ टक्के कर्मचाऱ्यांवर कामकाज सुरु होते. हे कामकाजही आता बंद करण्यात आले असून शनिवार पासून विद्यापीठ लॉकडाउन करण्यात आले आहे. पुढील आदेश जाहिर करण्यात येतील अशा सुचना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिल्या आहेत. विद्यापीठातील शैक्षणिक अधिविभाग, प्रशासकीय विभाग बंद ठेवण्यात येणार आहेत. या कालावधीमध्ये अधिविभागप्रमुख, संचालक, शिक्षक, संशोधक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना घरी राहून आवश्यक असल्यास काम करण्याच्या सुचनाही दिल्या आहेत. तसेच एखाद्या कामकाजाकरीता विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांची गरज भासल्यास विभागप्रमुखांच्या आदेशानुसार कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे.



पुढारी

# ‘कोरोना’विषयक मानसिक समस्या निवारणासाठी समुपदेशन

## शिवाजी विद्यापीठाची विशेष हेल्पलाईन; ३० जणांची टीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूच्या साथीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये विविध प्रकारच्या मानसिक स्वास्थ्याशी निगडित समस्या उद्‌भवत असल्याची बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने संबंधित नागरिकांसाठी फोन-इन समुपदेशन विशेष हेल्पलाईन निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा प्रशासनाच्या मान्यतेने समुपदेशन हेल्पलाईन लवकरच कार्यान्वित होणार असून गरज भासल्यास प्रत्यक्ष समुपदेशनही करण्यात येणार आहे.

कोरोना विषाणूची साथ व त्या अनुषंगाने देशात उद्‌भवलेली परिस्थिती



शिवाजी विद्यापीठातून...

यामुळे नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होण्याची शक्यता असून मानसिक व्याधीची सुरुवात या काळात होऊ शकते. त्याचा परिणाम शारीरिक स्वास्थ्यावर होण्याचीशक्यता असते. अशा परिस्थितीत प्राथमिक टप्प्यावर योग्य व शास्त्रशुद्ध समुपदेशन मिळाल्यास व्यक्तीची सकारात्मकता वाढून त्याचा मानसिक आजारापासून बचाव करता येऊ शकेल. ही गोष्ट लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या एम.एस.डब्ल्यू. अधिविभागाचे प्रा. डॉ. अमोल मिणचेकर यांच्या समन्वयाने नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्याकरिता फोन-इन समुपदेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, समुपदेशनाची व्यावसायिक मूल्ये व प्रतिबंधात्मक दक्षता घेऊन समुपदेशन करण्यात येणार आहे. उपक्रमात सहभागी शिक्षक, विद्यार्थी हे जिल्हा प्रशासनाच्या मान्यतेने गरज भासल्यास प्रत्यक्ष समुपदेशनासाठी जातील.

> कोरोना विषाणूच्या साथीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत नागरिक दडपणाखाली भीती, असहाय्यता व निराशेच्या भावनेने ग्रस्त झाल्याची उदाहरणे समोर येत आहेत. अशा परिस्थितीत संवाद महत्त्वाचा उपाय व उपचार आहे. विद्यापीठाने नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समुपदेशन हेल्पलाईन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा नागरिकांना निश्चितपणे लाभ होईल.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

समुपदेशनासाठी आवश्यक अशी कार्यप्रणाली व मार्गदर्शक तत्त्वांचीही निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार, विद्यापीठात एमएसडब्ल्यू शिकविणारे शिक्षक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी अशी एकूण ३० जणांची टीम हेल्पलाईनद्वारे संचारबंदी कालावधीत योग्य ती दक्षता घेऊन समुपदेशन उपक्रम राबवेल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून विद्यार्थ्यांना ओळखपत्रे दिली जातील. हेल्पलाईन सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीत कार्यान्वित राहील. सर्व प्रणालीची माहिती हेल्पलाईन क्रमांकांसह विद्यापीठाचे संकेतस्थळ व समाजमाध्यमांतून उपलब्ध केली जाणार आहे.

Kolhapur Edition
6 Apr, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

लोकमत

# विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन लांबणीवर

## 'लॉकडाऊन'चा परिणाम; समितीच्या भेटीवर अनिश्चिततेचे सावट

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमुळे शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्या वतीने (नॅक) करण्यात येणारे मूल्यांकन लांबणीवर पडणार आहे. एप्रिलअखेर मूल्यांकनासाठी कोअर टीमच्या विद्यापीठ भेटीवर देखील अनिश्चिततेचे सावट पसरले आहे.

विविध अधिविभाग आणि प्रशासकीय विभाग, विद्यार्थी, महाविद्यालय, अभ्यासक्रम, संशोधनविषयक माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने संकलित करून त्याचा इन्स्टिट्युशन इन्फॉर्मेशन फॉर क्वालिटी अॅश्युरन्स (आयआयक्यूए) अहवाल तयार करून तो दि. ३ डिसेंबर रोजी 'नॅक'च्या पोर्टलवर जमा केला. तो समितीकडून मान्य झाला. त्यानंतर दि. १३ फेब्रुवारीला 'सेल्फ स्टडी रिपोर्ट' (एसएसआर) सादर करण्यात आला. त्याची पडताळणी करून स्टार्टअपचे प्रमाण, प्रदान केलेली शिष्यवृत्ती, आदींबाबतच्या पुराव्यांची मागणी आणि काही त्रुटींची पूर्तता करण्याची सूचना 'नॅक'ने केली. त्याची पूर्तता विद्यापीठाकडून करण्यात आली. त्यानंतर 'नॅक'कडून 'डीव्हीव्ही'ची (डेटा व्हॅलिडिटेशन अॅंड व्हेरिफिकेशन) विविध निकषांनुसार विद्यापीठाची विश्लेषणात्मक आणि संख्यात्मक माहिती पूर्तता होऊन एप्रिलच्या अखेर कोअर टीमने विद्यापीठाला भेट देऊन, मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन होते.

> नॅक मूल्यांकनाबाबतची विद्यापीठाच्या पातळीवरील सर्व प्रक्रिया, अहवाल सादर केले आहेत. विविध अधिविभागप्रमुखांनी सध्याच्या लॉकडाऊनच्या कालावधीत वर्क फ्रॉम होमच्या माध्यमातून आपापल्या विभागांची सादरीकरणे तयार केली आहेत.
>
> \- डॉ. आर. के. कामत,
> अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

Kolhapur Main
Page No. 2 Apr 06, 2020
Powered by: erelego.com

# विद्यापीठाची विशेष समुपदेशन हेल्पलाइन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर




करोना विषाणूच्या साथीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये विविध प्रकारच्या मानसिक स्वास्थ्याशी निगडित समस्या उद्भवत असल्याची बाब लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने संबंधित नागरिकांसाठी विशेष हेल्पलाइन तयार केली आहे. जिल्हा प्रशासनाच्या मान्यतेने आणि सहकार्याने ही समुपदेशन हेल्पलाइन लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहे. गरज भासल्यास प्रत्यक्ष समुपदेशनही करण्यात येणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

करोना विषाणूची साथ आणि त्या अनुषंगाने देशात उद्भवलेली अभूतपूर्व परिस्थिती यामुळे नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम शारीरिक स्वास्थ्यावरही होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत जर प्राथमिक टप्प्यावरच योग्य व शास्त्रशुद्ध समुपदेशन मिळाले, तर व्यक्तीची सकारात्मकता वाढून त्याचा मानसिक आजारापासून बचाव करता येऊ शकेल. ही बाब लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या एम.एस.डब्ल्यू. अधिविभागाचे प्रा. अमोल मिणचेकर यांच्या समन्वयाने नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्याकरिता फोन-इन समुपदेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे.

विद्यापीठात एमएसडब्ल्यू शिकविणारे शिक्षक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी अशी एकूण ३० जणांची टीम हेल्पलाइनद्वारे संचारबंदी कालावधीत योग्य ती दक्षता घेऊन समुपदेशन उपक्रम राबवेल.

### हेल्पलाइनची वेळ

हेल्पलाइन सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीत कार्यान्वित राहील. या सर्व प्रणालीची माहिती हेल्पलाइन क्रमांकांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून व समाजमाध्यमांतून उपलब्ध केली जाईल.

करोना विषाणूच्या साथीमुळे आणि त्या अनुषंगाने उद्भवलेल्या भीषण परिस्थितीमुळे नागरिक मोठ्या दडपणाखाली तसेच भीती, असहायता आणि निराशेच्या भावनेने ग्रस्त झाल्याची उदाहरणे समोर येत आहेत. अशा परिस्थितीत संवाद हा अतिशय महत्त्वाचा उपाय आणि उपचार आहे. ही बाब लक्षात घेऊन विद्यापीठाने आपल्या एमएसडब्ल्यू अधिविभागाच्या माध्यमातून नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी समुपदेशन हेल्पलाइन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. गतवर्षी उद्भवलेल्या महापूर स्थितीमध्ये सुद्धा नागरिकांचे मानसिक पुनर्वसन करण्यात मोलाची कामगिरी यशस्वीपणे बजावली होती. यावेळीही विद्यापीठ त्याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हेल्पलाइन सुरू करीत आहे.

### समुपदेशकांची नावे व संपर्क क्रमांक

- प्रा. अमोल मिणचेकर (समन्वयक) : ९८२२५६७७२०
- विनोद ठिकणे : ९५५२१२७२०९
- मोहिनी देवकर : ९१४५६०९६४७
- सागर अवलक्की : ८६००७३६१४७
- भैय्यासाहेब नलवडे : ९९७०९६५५७०
- स्नेहल जगदाळे : ७८७५१३७५०३
- नागेश पवार : ८७८८३२३५००
- रागिणी बालुगडे : ७४२०९७९९७५
- पृथ्वीराज शेटे : ८८३०८२९३०१
- सिद्धांत घोरपडे : ८८३०९८२८०५



# विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक

**मुंबई :** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९ ) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा भाग म्हणून सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या नियोजित परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या संदर्भातील आढावा घेण्यासाठी उद्या (ता. ६) सकाळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू यांच्या सोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक होणार आहे. या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग बैठकीत महाविद्यालय परीक्षा वेळापत्रक नियोजन, शैक्षणिक वर्षाचे नियोजन यावर चर्चा करण्यात येणार आहे.